16 डिसेंबर 2013

# आपल्या पदाची प्रतिष्ठा राखण्यासाठी न्यायमूर्ती गांगुली यांना राजीनामा द्यायला पाहिजे

**अरुण जेटली**

**विरोधी पक्षनेते, राज्यसभा**

आज इंडियन एक्सप्रेसने त्या कथित घटनेचा विस्तारपूर्ण वृत्त दिले आहे की ज्यात एक युवा इंटर्न आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी जज अर्थात न्यायमूर्ती अशोक कुमार गांगुली शामील आहेत. जर हा काल्पनिक आरोप असता तर न्यायमूर्ती अशोक कुमार गांगुली यांच्याकडून असे सांगणे उचित असते की कायदा आपले काम करील आणि ते फक्त दोषी आढळल्यानंतरच आपला राजीनामा देतील. मात्र प्रकरण काहीसे वेगळे आहे.

भारताच्या मुख्य न्यायाधीशांनी प्रकरणाची चौकशी करण्यासठी तीन जज यांची नेमणूक केली. इंटर्न आणि न्यायमूर्ती गांगुली दोघांनी सर्वोच्च न्यायालयाच्या तीन वर्तमान जज समोर आपले म्हणणे सादर केले. मिडीया अहवालातून असे कळते की तीन जज यांनी सर्वात प्रथम इंटर्नची तक्रार आणि खरेपणा पाहिली. तथापि हा काही काल्पनिक किंवा मिथ्या आरोप नाही आहे. तीन जज यांच्या अहवालाच्या आधारावर हे समजण्यामागे कारण आहे की गुन्हा घडला आहे.

कारण की यात सर्वोच्च न्यायालयाचा एक माजी जज शामील आहे, जे वर्तमान पश्चिम बंगाल मानव अधिकार आयोगाचे अध्यक्ष आहेत. न्यायमूर्ती गांगुली यांनी पदावर राहिल्याने काही प्रश्न उपस्थित होतात. पहिला प्रश्न असा की, जर प्रकरण माजी जज चे नसते आणि एखाद्या प्रसिद्ध राजकारणी नेत्याचे असते तर न्यायिक संस्थांनी पूर्णपणे यापासून हात झटकले असते किंवा त्यांनी चौकशीवर देखरेख ठेवली असती ? तथ्य हे आहे की त्यात सर्वोच्च न्यायालयाचा जज शामिल आहे. तथापि हे आवश्यक आहे की न्यायिक चौकशीचे मापदंड हे सामान्य मापदंडाच्या तुलनेत मोठे असावेत. दूसरे असे की इतके गंभीर आरोप होत असताना न्यायमूर्ती गांगुली पश्चिम बंगाल मानव अधिकार आयोगाच्या अध्यक्षांच्या रुपाने आपल्या कृत्याचे खंडन करु शकतात. तीसरे असे की हे योग्य आणि बरोबर होणार नाही का की माजी जज एका उच्च

अधिका-याऐवजी एका सामान्य नागरिकाच्या रुपातून या आरोपांचा युक्तीवाद करेल ? जर ते आपल्या पदाचा राजीनामा देत असतील तर ते आपल्या पदाचे रक्षण करतील. त्यांच्याकडून आपल्या पदावर चिकटून राहण्यातून असे सिद्ध होते की जज सुद्धा अधिकांश राजकीय पदावर आसनस्थ लोकांप्रमाणे तोपर्यंत पदावर चिकटून राहतात जोपर्यंत प्रबळ जनमत त्यांना पद सोडण्यास भाग पाडत नाही.